# समिति दर्पण

**सप्टेंबर २०२६**

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


### समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात सात आणि नगरमध्ये दोन अशी नऊ वसतिगृहे आहेत. त्यात १३५० हून अधिक विद्यार्थी -विद्यार्थिनींची निवास - भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर सात दशके समितीचे काम चालते.

# ‘गर्जतो मराठी'ला नगरकरांचा उदंड प्रतिसाद

## जुन्या- नव्या मराठी गाण्याची रसिकांना मेजवानी, समिती कार्याची ओळख




**अहिल्यानगर-** मराठी मनाला साद घालणाऱ्या एकापेक्षा एक सरस मराठी गीतांनी अहिल्यानगरमधील रसिकांची सायंकाळ भारावून गेली. निमित्त होते विद्यार्थी साहाय्यक समितीने आयोजित केलेल्या ‘गर्जतो मराठी’ या नव्या- जुन्या गाण्यांच्या सांगितिक कार्यक्रमाचे.

नाशिक येथील सरगम थिएटर्स प्रस्तुत ‘गर्जतो मराठी’ हा कार्यक्रम समितीच्या वतीने सावेडी येथील रावसाहेब पटवर्धन स्मारकामध्ये आयोजित केला होता. अहिल्यानगरमधील रसिकांना मराठी गाण्यांचा आस्वाद घेता यावा, तसेच विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कार्याची ओळख व्हावी, हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

संगीतकार नंदकुमार देशपांडे आणि संतोष कराळे यांच्या कुशल वादकवृंदाने, तसेच निवेदक संजय किल्लेदार यांच्या खुमासदार निवेदनाने रसिकांना तब्बल तीन तास खिळवून ठेवले. गायकांनी आपल्या मधुर स्वरांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

मैफिलीची सुरुवात गणेश वंदनेने झाली. त्यानंतर 'एक धागा सुखाचा', 'शुक्र तारा मंद वारा', 'चंद्र आहे साक्षीला'* या गीतांनी सभागृहात प्रीतधुंदी पसरली. 'या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे,' या गीताला टाळ्यांचा कडकडाटाने दाद मिळाली. उत्तरार्धात 'अगं नाच नाच राधे उधळूया रंग', 'सांग कधी कळणार तुला भाव माझ्या मनातला' तसेच 'लाजून हसणे...', 'मी फुलवंती, मी जलवंती' या बहारदार गाण्यांनी धमाल उडवून दिली. छत्रपती शिवरायांच्या शौर्याची गाथा सांगणाऱ्या पोवाड्याने अंगावर रोमांच उभे राहिले. शेवटी 'लाभले भाग्य आम्हास बोलतो मराठी,' या स्फूर्तिगीताला अवघ्या सभागृहाने उभे राहून दाद दिली.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. सौ. सुधा कांकरिया, डॉ. श्रीकृष्ण जोशी, ॲड. दीपक शर्मा, प्रमोद सोनटक्के उपस्थित होते. त्यांनी समितीच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचे कौतुक केले. कलाकारांचा सन्मान समितीचे कायम विश्वस्त तुकाराम गायकवाड, कार्यकर्ते मनोज गायकवाड, नंदकुमार देशपांडे, शिवाजी बोलभट, सौ. सुनीता झिंजाड, चंद्रकांत कुलकर्णी, जिभाऊ शेवाळे यांच्या हस्ते झाला. समितीचे माजी विद्यार्थी, कार्यकर्ते रवींद्र देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. वसतिगृह उपसमितीचे अध्यक्ष दिनकर वैद्य यांनी आभार मानले.

# नऊ दिवसांत अनुभवली जपानची नवलाई


**रत्नाकर मते**
विश्वस्त

**तुषार रंजनकर**
कार्यकारी विश्वस्त




फ्रान्समध्ये शिक्षण घेत असताना तेथील स्थानिक लोकांनी शिक्षणासाठी केलेल्या मदतीतून प्रेरणा घेत डॉ. अच्युतराव आपटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थी साहाय्यक समितीची स्थापना केली. त्यानंतर फ्रान्स मित्र मंडळाच्या माध्यमातून दरवर्षी विद्यार्थी साहाय्यक समितीला नियमित भेट देणारे फ्रेंच पाहुणे एवढाच काय तो समितीचा परदेशाशी संबंध असावा.

गेल्या पाचसहा वर्षांमध्ये समितीने परदेशातून येणारी आर्थिक मदत वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केले आणि दुबईस्थित भारतीय उद्योजकाच्या मदतीने अहिल्यानगरमधील वसतिगृह उभे राहिले तर अमेरिकास्थित भारतीयांच्या मदतीतून पुण्यातील मुलींचे वसतिगृह उभे राहिले.

या दरम्यान समितीच्या कार्यकर्त्यांनी समितीचे अध्यक्ष आणि विश्वस्त मंडळाच्या प्रेरणेने दुबई, अमेरिकेला भेटी दिल्या. याच साखळीतली पुढची कडी म्हणून अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या प्रेरणेने आणि समितीबरोबर काम करणाऱ्या व्यावसायिक संस्थेच्या सहकार्याने आम्हा दोघांना जपानला भेट देण्याची संधी मिळाली. उद्देश होता, जपानमधील समाजजीवन अनुभवणे, तेथील प्रगत व्यवस्थेचा अनुभव घेणे आणि समितीच्या जपानमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गाठीभेटी, तेथील काही संस्थांची पाहणी, चर्चा व समितीतील विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या संधींची माहिती घेणे.

आम्ही दोघे ७ सप्टेंबरला टोकियो विमानतळावर उतरलो. विमानतळावर उतरल्यानंतर स्वच्छता, कर्मचाऱ्यांची अगत्यशीलता, आपल्या कामाप्रती असलेली निष्ठा,तंत्रज्ञानाचा वापर करून अत्यंत सोप्या केलेल्या नियमित प्रक्रिया पाहून आम्ही भारावून गेलो. यानंतरच्या ९ दिवसांत आम्ही ऑटोमोटिव्ह वर्ल्ड २०२६ या ऑटोमेशन आणि रोबोटिक्सविषयक प्रदर्शनाला भेट देऊन अद्ययावत उत्पादने आणि त्याकरिता लागणाऱ्या एक्सेसरीजची माहिती घेतली. काही प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या. व्यवसायानिमित्त जपानमध्ये असणाऱ्या समितीच्या माजी विद्यार्थ्यांच्या भेटी घेतल्या. जपानमधील नोकरी- व्यवसायात असणाऱ्या संधींची माहिती घेण्यासाठी दोन संस्थांना भेट दिली.

नऊ दिवसांच्या अत्यंत व्यग्र दिनक्रमामध्ये आम्ही पायी, बस, लोकल ट्रेन, बुलेट ट्रेन, अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत टॅक्सीने प्रवास केला. बस, ट्रेन न मिळाल्याने उशीर झाला, असे अजिबात घडले नाही. प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची कामाप्रती निष्ठा आणि तत्परता तर कल्पनातीत. एके ठिकाणी यंत्रातून बाहेर न आलेला रेल्वे पास काही सेकंदात आमच्या हातात आला तर एका ठिकाणी पाच हजार येनच्या हरवलेल्या पासच्या संदर्भात पाचसहा मिनिटे चौकशी आणि दहाव्या मिनिटाला नवीन पास, हे अनुभव खरोखरच स्तिमित करणारे होते.

रस्ते, पूल, रेल्वे या आणि अशा मूलभूत भौतिक सुविधांना तंत्रज्ञानाची जोड आणि या सेवासुविधा निर्माण करताना केलेला सूक्ष्म विचार तर आपले डोळे खाड्कन उघडून आपण कितीही वेगाने पुढे जात असलो, तरी कुठे आहोत, याची जाणीव करून देतात. अत्यंत उच्चतम दर्जाची देखभाल, नियमित तपासणी आणि दुरुस्ती हे या सेवासुविधा किंचितही अडथळा न येता अव्याहतपणे सुरू राहण्याचे गमक! एक गोष्ट मात्र खटकली.

प्रेक्षणीय स्थळे अत्यंत स्वच्छ, प्रशस्त, भव्य आणि आस्थेने जपलेली दिसतात. मग ते प्राचीन वस्तूसंग्रहालय असो, जागतिक वारसा स्थळ असलेले मंदिर असो,

पान २ वर ▶

# विनावर्गणी, पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा

## तीन दिवसीय ज्ञानसत्रात तज्ज्ञांचे मार्गदर्शन

दरवर्षीप्रमाणे यंदाही विद्यार्थी साहाय्यक समितीत १४, १५, १६ सप्टेंबर रोजी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यात आला. यानिमित्ताने विविध ज्ञानसत्रांचे आयोजन करण्यात आले. तसेच विनावर्गणी पर्यावरणपूरक गणेशोत्सव स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेसाठी 'महाराष्ट्र' ही मध्यवर्ती संकल्पना होती.१४ सप्टेंबर रोजी सकाळी समितीच्या सर्व वसतिगृहांमध्ये गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. त्यानंतर मुलींच्या नवीन वसतिगृहात रोहन महाडिक या विद्यार्थ्याचे 'महाराष्ट्र' या विषयावर व्याख्यान झाले. दुपारी श्रीमती लतिका गायतोंडे वसितगृहामध्ये लजपत संकुल आणि मुलींचे नवीन वसतिगृह यांचा एकत्रित सांस्कृतिक कार्यक्रम झाला. त्यामध्ये मुलामुलींनी गायन, नृत्य, कविता या माध्यमातून आपल्या कलांचे सादरीकरण केले. ता. १५ सप्टेंबरला दासबोध- leadership and personality development विषयावरील ज्ञानसत्रात श्री. श्रीनिवास रायरीकर यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी 'दासबोध' ग्रंथाच्या माध्यमातून नेतृत्व आणि व्यक्तिमत्त्व विकास याविषयी धडे विद्यार्थ्यांना दिले. ता. १६ सप्टेंबरला 'पुण्यातील ऐतिहासिक वारसा' या विषयावर ज्ञानसत्र झाले. या सत्रात डॉ. गणेश राऊत यांनी पुण्याचा इतिहास मुलांपर्यंत पोहोचविला.

**विनावर्गणी गणेशोत्सव या स्पर्धेतील विजेते**

**प्रथम-** डॉ. अच्युतराव आपटे वसतिगृह **व्दितीय-** लजपत संकुल मुलांचे वसतिगृह,
**तृतीय-** मधुभाऊ चौधरी वसतिगृह, अहिल्यानगर.



डॉ. अच्युतराव आपटे वसतिगृहातील प्रथम क्रमांकाची सजावट.

# समितीतील वास्तव्यात आयुष्याला कलाटणी



## तयाचा वेलू...

**शंकर बारवे**



मी मूळचा पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील घोडेगावचा. आईवडील शेतकरी, जेमतेम अडीच एकर शेती. शिक्षणाची आवड होती. बारावीनंतर बी.कॉम.साठी पुण्यात मॉडर्न कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. राहण्याचा प्रश्न होता. गावात येणाऱ्या एका कीर्तनकाराकडून समितीची माहिती मिळाली. त्यांचा भाचा समितीमध्ये राहून शिकत होता. प्रयत्न करूनही त्यावेळी समितीमध्ये प्रवेश मिळाला नाही. पण त्याच वेळी मनाशी खूणगाठ बांधली, की परत इथे यायचेच!

बी.कॉम.नंतर एम.बी.ए.साठी (फायनान्स मॅनेजमेंट) डॉ. विखे पाटील मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घेतला. त्याहीवेळी पहिल्या वर्षी समितीमध्ये प्रवेश मिळाला नाही, दुसऱ्या वर्षी मिळाला. मॅनेजमेंट अभ्यासक्रमाचा मी समितीतील पहिला विद्यार्थी! तोपर्यंत समितीमध्ये मोबाईल, लॅपटॉप यांना परवानगी नव्हती. अभ्यासक्रमाची गरज म्हणून माझ्यापासून त्याची सुरुवात झाली.

मॅनेजमेंटचा विद्यार्थी म्हणून पहिल्याच महिन्यात मला विद्यार्थी प्रमुख करण्यात आले. मुलांच्या दोन वसतिगृहांतील सुमारे साडेतीनशे विद्यार्थ्यांचा मी प्रमुख झालो. कॉलेजमध्ये शिकलेली मॅनेजमेंटची तत्वे वसतिगृहात अमलात आणू लागलो. MIS, Excel sheets आणि त्या आधारे विविध कामांचे नियोजन यशस्वीपणे करू लागलो.

आपल्याला माणसांचे व्यवस्थापन (People Management) चांगले जमते, हे मला समितीमुळे अनुभवायला मिळाले. तेव्हा मी छंद म्हणून छोटे- मोठे व्हिडिओ करायचो. मी गावी कॉलेजमध्ये नाटके लिहिली होती, दिग्दर्शित केली होती. मी नाटकात कामही करायचो. एकदा निर्मलाताई पुरंदरे मला म्हणाल्या, "एवढी तुला आवड आहे, तर समितीवर एखादी फिल्म का करत नाहीस?" मी समितीवर माहितीपट केला. तो माझा पहिला माहितीपट होताच, पण समितीचा सुद्धा पहिलाच माहितीपट होता. त्याचे खूप कौतुक झालं. तोच माझ्या आयुष्याचा टर्निंग पॉइंट ठरला. समिती वास्तव्यातील केवळ एकाच वर्षात माझ्या आयुष्यात मोठा बदल घडला आणि तो कायमस्वरूपी राहिला.

मी सुरुवातीला फायनान्स क्षेत्रात तीन नोकऱ्या केल्या. पण त्या सगळ्याच जेमतेम सहा- सात महिने! आपले मन त्यात रमत नाही, हे लक्षात आले. आपली आवड क्रिएटिव्ह क्षेत्रातच आहे, हे लक्षात घेऊन पुढे दोन वर्षे जाहिरात आणि फिल्म प्रॉडक्शनशी संबंधित गोष्टी, कामे करत करत शिकलो. काही ऑनलाईन कोर्स केले. नोकऱ्यांची धरसोड करून, खात्रीलायक पैसे देणारा मार्ग सोडून अशाश्वत क्षेत्रात उडी मारण्याचे धारिष्ट्य तर दाखवले. अर्थात आईवडिलांना ते पटवून देणे फारच अवघड गेले. माझा जम बसेपर्यंत मी गावी गेलो नाही. एमबीए करण्यासाठी कर्ज घेतले होते. मला काम मिळत गेले, पैसे मिळू लागले आणि दोन वर्षात ते कर्ज फेडले. हे नोकरी करून शक्यच झाले नसते, हे आईवडिलांना पटवून दिले. मग त्यांनीही मला पाठिंबा दिला. शासनाच्या विविध योजनांच्या जाहिराती करण्यासाठी टेंडर निघतात. ती भरली. शैक्षणिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रात मी काम केले होतेच. त्यातून पॅनलवर निवड झाली. तेव्हा मी सगळ्यात कमी वयाचा निर्माता होतो.

"कथा सांगायच्या पण परिणामकारकरित्या!" हे ध्येय ठेवून १० बाय ५ च्या खोलीत एक लॅपटॉप आणि एक कॅमेरा यांच्यासह व्यवसायाची सुरुवात केली. २०१२ मध्ये स्वतःची SB Productions Private Limited ही कंपनी स्थापन केली. सध्या या कंपनीत ७० जण काम करतात, शिवाय पाच पूर्णवेळ फ्री लान्सर आहेत. Creative writing, animation, editing, graphics, shooting अशा कामाच्या गरजेनुसार योग्य कौशल्य असलेल्या व्यक्तींची नियुक्ती केली. अनेक क्लासेससाठी e- content सुद्धा तयार केला आहे. फिल्म प्रॉडक्शनशिवाय, events, promotions, banners, print, digital, social media, jingles ह्या मध्येही माझी कंपनी कार्यरत आहे. ह्या सगळ्यामागे समितीची प्रेरणा आहे. मला अगदीच वेगळ्या फिल्डमध्ये जाताना समितीच्या कौतुकाचा आधार होता. या क्षेत्रात कोणाचे पाठबळ मिळाले नाही, पण समितीमुळे जिद्द मिळाली. त्यामुळे अजूनही माझी समितीशी नाळ कायम आहे. आतापर्यंत पंचाहत्तरपेक्षा जास्त मुलांना मी 'कमवा- शिका'अंतर्गत काम दिले आहे. मुलांना हे काम आवडते, त्याचबरोबर या क्षेत्रातील ग्लॅमर बघून येऊ नका, त्यामागे किती कष्ट आहेत ते बघा, असा संदेश त्यांना मिळतो.

महाराष्ट्र शासनाच्या विविध अभियानांसाठी मी काम केले आहे. त्यापैकी माननीय यशवंतराव चव्हाण यांच्यावर केलेल्या माहितीपटाचे अनावरण राष्ट्रपतींच्या हस्ते झाले, हा माझ्या आयुष्यातील अभिमानाचा क्षण आहे.

कंपनीच्या कामात पत्नी निशा हिचे सहकार्य मिळते. ती एमबीए (एचआर) असून ऑफिसमधील सगळी कामे समर्थपणे सांभाळते. मुलगा विराज शाळेत शिकत आहे. एसबी सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून मी विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सहभाग घेतो. माझे मूळ गाव घोडेगावातील सामाजिक संस्थांच्या कार्यातही योगदान देतो. समितीच्या माजी विद्यार्थी मंडळातही सहभाग आहे. **(शब्दांकन : माधवी कुलकर्णी)**

## पाककला स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

दरवर्षीप्रमाणेच यंदाही बुवाजी सहस्रबुद्धे पाककला स्पर्धेचे आयोजन २० सप्टेंबर रोजी लतिका गायतोंडे वसतिगृहात करण्यात आले होते. स्पर्धेसाठी एकूण आठ टीम तयार करण्यात आल्या होत्या. प्रत्येक टीममध्ये मुले व मुली मिळून ७ – ८ जण सहभागी झाले होते. यंदाच्या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे मुलांचा सहभाग मुलींपेक्षा अधिक होता.

स्पर्धेसाठी व्हेज पुलाव व कोशिंबीर हे पदार्थ तयार करायचे होते. त्यासाठी लागणारे सर्व साहित्य वसतिगृहामार्फत उपलब्ध करून देण्यात आले. प्रभाकर पाटील यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या स्पर्धेसाठी विनया ठोंबरे व सुनीता भागवत यांनी आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिले. स्पर्धेदरम्यान निसार चौगुले यांनी आपल्या गायनाने वातावरणात उत्साह निर्माण केला व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. सुप्रिया केळवकर व प्रज्ञा सातारकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. डॉ. ज्योती गोगटे, मोनाली नळे, शीतल शिंदे व कुंदन पठारे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.सर्व टीमचे पदार्थ अप्रतिम झाले, त्यातून सर्वोत्कृष्ट तीन टीमची विजेते म्हणून निवड करण्यात आली. व्यवस्थापनातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी स्पर्धेचे उत्तम नियोजन केले.

पाककला स्पर्धेतील विजेते- **प्रथम**- बासमती ग्रुप, **द्वितीय**- इंद्रायणी ग्रुप, **तृतीय**- कोलम ग्रुप

# डीपएन्ट्रा बिल्ड फेस्टमध्ये ७० विद्यार्थ्यांचा सहभाग

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या प्रतापराव पवार स्किल अँड आंत्रप्रेन्युअरशिप डेव्हलपमेंट सेंटर येथे २६ सप्टेंबर रोजी आयोजित डीपएन्ट्रा बिल्ड फेस्ट २०२६ मध्ये ७० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



विद्यार्थ्यांनी एआय, मशीन लर्निंग, जनरेटिव्ह एआय, सायबर सिक्युरिटी, एज्युकेशन, सोशल इम्पॅक्ट, फिनटेक आणि सस्टेनेबिलिटी या क्षेत्रांतील रिअल-वर्ल्ड प्रॉब्लेम्सवर काम करून वर्किंग प्रोटोटाइप्स तयार केले. उद्योग क्षेत्रातील पंधराहून अधिक तज्ज्ञांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपले अनुभव सांगितले. अंतिम सादरीकरणात विद्यार्थ्यांनी केवळ तंत्रज्ञानाचे प्रदर्शन केले नाही, तर त्यांनी प्रश्न समजून घेतले. त्यांच्या विचारांमध्ये स्पष्टता आली. त्यांचा आत्मविश्वास वाढलेला दिसला.

या फेस्टमधील तीन विजेत्या टीम्सना डीपएन्ट्रा गिफ्ट्स, सर्टिफिकेट्स आणि डीपएन्ट्रासोबत तीन महिन्यांच्या इंटर्नशिपची संधी देण्यात आली.



*समितीच्या माजी विद्यार्थिनी आणि कार्यकर्त्या सौ. स्नेहा फडके यांनी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ, तसेच त्यांचे पती श्रीकांत फडके यांनी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ पुण्यातील मुलींच्या नवीन वसतिगृहातील दोन खोल्यांसाठी देणगी दिली. या खोल्यांचे उद्घाटन श्री. व सौ. फडके आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या हस्ते १ ऑगस्टला झाले.*

## सिंगापूरच्या एआय परिषदेत सहभागाची शुभमला संधी



सिंगापूर येथे २५ ते २९ ऑगस्ट दरम्यान झालेल्या 'AIMX' या कृत्रिम बुद्धिमत्ता परिषदेत आणि 'द बिझनेस शो एशिया'मध्ये सहभागी होण्याची संधी समितीचा विद्यार्थी शुभम प्रकाश गलांडे याला मिळाली. पिंपरी- चिंचवड विद्यापीठाचे डॉ. गिरीश देसाई यांनी ही संधी उपलब्ध करून दिली. समितीच्या 'कमवा व शिका' योजनेतून आंतरराष्ट्रीय वेबसाइट्स, डिजिटल प्रकल्प आणि कार्यक्रम व्यवस्थापनाचा अनुभव शुभमला होता. त्याला राष्ट्रीय स्तरावरील एआय आणि तंत्रज्ञान परिषदांची जोड मिळाली. कृत्रिम बुद्धिमत्ता उद्योगांचे स्वरूप कसे बदलत आहे, याची प्रत्यक्ष उदाहरणांसह ओळख झाली. चीन, मलेशिया आणि सिंगापूरमधील कंपन्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा करता आली. त्यातून आत्मविश्वास वाढल्याचे शुभमने सांगितले. सिंगापूरच्या विविध भागांत फिरताना तेथील लोकजीवन, शिस्त आणि रोजच्या जगण्यात सहज सामावलेले तंत्रज्ञानही त्याला अनुभवता आले.

## नऊ दिवसांत अनुभवली जपानची नवलाई

▶ पान १ वरून

भूकंपामुळे हानी झालेले स्थान असो किंवा ३५० मीटर उंचीवरून टोकियो दर्शन घडविणारे स्काय ट्री असो.

या दौऱ्यात अनुभवलेला जपानी माणूस आणि संस्कृती आत्मपरीक्षण करायला लावणारी आहे. मी केलेली कृती तशीच इतर सर्वांनी केली, तर त्याचा समाजजीवनावर, देशावर चांगला- वाईट काय परिणाम होईल, याचा प्रथम विचार करून हा परिणाम सकारात्मकच असला पाहिजे, या विचारातून केलेली शिस्तीची आखणी आणि त्याबरहुकूम केलेली वागणूक पदोपदी प्रत्ययास येते. सार्वजनिक ठिकाणी केलेला आपला कचरा प्रत्येक जण पिशवीत बरोबर घेऊन जाताना दिसतो. कोणीही सार्वजनिक ठिकाणी मोबाईलवर बोलताना, मोठ्या आवाजात व्हिडिओ पाहताना, दुसऱ्याला धक्का देऊन पुढे जाताना किंवा वाद घालताना दिसला नाही. जपानी नागरिकांची सहकार्य करण्याची, समोरच्या व्यक्तीला आदर देण्याची वृत्ती अनुभवास येते. पत्ता विचारणाऱ्या आम्हाला एकाने आमच्या हॉटेलपर्यंत नेऊन सोडले, तर अनेक ठिकाणी लोकांनी मनापासून आमचे 'अरिगातो गोझायमासू' (धन्यवाद, तुमचं स्वागत असो) म्हणत स्वागत केले.

जपानमध्ये असणाऱ्या माजी विद्यार्थ्यांबरोबर झालेल्या चर्चेत तेथे नोकरी- व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध असल्याची माहिती मिळाली. परंतु या संधी मिळविण्यासाठी जपानी भाषेच्या प्राथमिक दोन परीक्षा देणे गरजेचे असते. या संदर्भात ए.जी.जी., टोकियो आणि JPGA Japan Global Academy (Japanese language school located on Awaji Island in Hyogo Prefecture, Japan. Approved by the Osaka Regional Immigration Bureau, it serves as an educational training institute primarily for international students looking to study or work in Japan) या दोन संस्थांबरोबर प्रत्यक्ष भेटीदरम्यान चर्चा झाली असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

एकूणच जपान हा भारताच्या तुलनेत चिमुकला देश अत्यंत अनुभवसमृद्ध करणारा आणि सकारात्मक विचार करायला लावणारा आहे.



*श्री. व सौ. अंजली उमेश झोपे यांनी पुण्यातील मुलींच्या नवीन वसतिगृहातील एका खोलीसाठी देणगी दिली. या खोलीचे उद्घाटन या दाम्पत्याच्या हस्ते नुकतेच झाले.*

# नवकल्पनांना मिळाला वैज्ञानिक दृष्टिकोन

## ‘यंग सायंटिस्ट १.०’ परिषदेला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद




मराठी विज्ञान परिषद (पुणे) आणि विद्यार्थी साहाय्यक समिती यांच्या वतीने ६ सप्टेंबर रोजी ‘यंग सायंटिस्ट १.०’ परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत १०४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन विविध सत्रांचा आणि उपक्रमांचा लाभ घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रा. विनय र. र. आणि शशिकला भाटे यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. डॉ. ज्योती गोगटे यांनी मुख्य भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रथम सत्रात अथर्व डोके यांनी ‘कृत्रिम बुद्धिमत्ता व भारतीय शेती’ या विषयावर, तर मनोहर खके यांनी ‘सेंद्रिय शेती’ या विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी समितीच्या ॲग्रिकल्चर प्रोजेक्टला भेट दिली. अथर्व डोके, सचिन खांडेकर आणि सौ. हेमा बापट यांनी विद्यार्थ्यांना प्रकल्पाची माहिती व प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले. ‘यंग सायंटिस्ट चॅलेंज’मध्येही विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. त्यानंतर श्री. अजित गटे यांनी रोबोटिक्स विषयावर मार्गदर्शन केले. प्रा. विनय र. र. यांनी आभार मानले. या परिषदेला विविध शैक्षणिक, वैज्ञानिक आणि नवोन्मेष क्षेत्रातील संस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. फर्ग्युसन कॉलेज, एस. एस. पी.एम.एस., मॉडर्न कॉलेज, ज्ञान प्रबोधिनीच्या निगडी कॅम्पसमधील अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर (ACIC) तसेच विज्ञान परिषदेचे प्रतिनिधी आणि विविध संस्थांमधील अभ्यासक परिषदेत सहभागी झाले होते. यासोबतच बॉटनी, केमिस्ट्री, फिजिक्स, मॅथेमॅटिक्स, इलेक्ट्रॉनिक्स अशा विविध विज्ञान शाखांमधील विद्यार्थ्यांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला. समितीच्या रोबोटिक्स लॅब आणि ॲग्रिकल्चर प्रोजेक्ट्समध्ये पुढील काळात सहभागी होण्याची इच्छा अनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.‘यंग सायंटिस्ट १.०’ या उपक्रमातून विद्यार्थ्यांना केवळ विज्ञानविषयक ज्ञान मिळाले नाही, तर प्रश्न विचारणे, प्रत्यक्ष प्रयोगातून शिकणे, तंत्रज्ञान समजून घेणे आणि नव्या कल्पनांकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहणे यासाठी एक प्रभावी व्यासपीठ मिळाले.

# विज्ञान कार्यशाळेत समितीच्या १४ विद्यार्थिनींचा सहभाग

## पालिका शाळेतील विद्यार्थ्यांना शिकविण्याची संधी

मराठी विज्ञान परिषद, मध्यवर्ती मुंबई यांच्या वतीने ८ व ९ सप्टेंबर २०२६ रोजी सोलापूर येथे दोन दिवसीय विज्ञान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे नियोजन मराठी विज्ञान परिषद, सोलापूर यांच्या वतीने करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी विद्यार्थी साहाय्यक समितीच्या १४ विद्यार्थिनी तसेच भोर येथील ४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. पुणे, सोलापूर, पंढरपूर, बार्शी आदी ठिकाणांहून महाविद्यालयीन विद्यार्थी या कार्यशाळेत सहभागी झाले होते.

इयत्ता सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची गोडी निर्माण व्हावी, त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन व जिज्ञासा वाढावी आणि विज्ञानाचा प्रसार व्हावा, या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यशाळेत विद्यार्थ्यांना विविध विषयांवरील रंजक व प्रात्यक्षिक स्वरूपाचे प्रयोग करून घेण्यात आले. त्यामुळे सहभागी विद्यार्थ्यांना विज्ञान विषय अधिक सोप्या, आनंददायी आणि कृतीशील पद्धतीने समजून घेण्याची संधी मिळाली.



या कार्यशाळेचा पुढील टप्पा म्हणून सहभागी विद्यार्थी महानगरपालिका व नगरपालिका शाळांमधील सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांना विविध विज्ञान प्रयोग शिकविणार आहेत. या उपक्रमासाठी मराठी विज्ञान परिषदेच्या (पुणे) खजिनदार शशीताई भाटे, तसेच समितीच्या कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

# नेतृत्वाचा आव्हानात्मक अनुभव



मराठी विज्ञान परिषद, सोलापूर यांच्या वतीने ८, ९ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय विज्ञान कार्यशाळेत पुणे जिल्ह्यातून सहभागी होण्याची संधी विद्यार्थी साहाय्यक समितीला मिळाली. या कार्यशाळेसाठी समितीच्या १४ विद्यार्थिनी, तसेच भोरमधील चार विद्यार्थ्यांच्या टीमचे नेतृत्व करण्याची संधी मला लाभली. माझ्यासाठी हा अनुभव पूर्णपणे नवीन, तितकाच आव्हानात्मक होता.

टीमचे नियोजन, व्यवस्थापन आणि त्यांच्याशी समन्वय साधणे हा माझ्यासाठी केवळ एक अनुभव नव्हता, तर स्वतःला नव्याने ओळखून घेण्याचा एक सुंदर प्रवास होता. विद्यार्थिनींना माझ्यासोबत सहज आणि सुरक्षित वाटावे, त्यांनी कोणताही संकोच न बाळगता आपल्या अडचणी व अनुभव मला सांगावेत, यासाठी मी सतत प्रयत्नशील होते. त्यांच्या प्रत्येक गरजेकडे लक्ष देताना नेतृत्व म्हणजे केवळ जबाबदारी नव्हे, तर प्रत्येक व्यक्तीला सोबत घेऊन पुढे जाणे, योग्य वेळी निर्णय घेणे, संयम राखणे आणि विश्वासाचे नाते निर्माण करणे, हे मला या काळात प्रकर्षाने जाणवले. या कार्यशाळेने माझ्या नेतृत्वगुणांना नवी दिशा दिली आणि आत्मविश्वासातही निश्चितच भर घातली. हा अनुभव माझ्या व्यक्तिमत्त्वाला समृद्ध करणारा ठरला. ही सुवर्णसंधी मला समितीच्या कार्यकर्त्या शशीताई भाटे आणि प्रा. विनय र.र. यांच्या माध्यमातून मिळाली. त्यांचा विश्वास, मार्गदर्शन आणि प्रोत्साहनामुळे मी ही भूमिका चांगल्या पद्धतीने साकारू शकले.

**सायली थोपटे,**

कमवा- शिका समन्वयक, विद्यार्थी साहाय्यक समिती, पुणे.

# स्वनेतृत्वापासून सामूहिक नेतृत्वाकडे

## चिन्मय विभुती भेटीत विद्यार्थ्यांना मिळाली नवी दृष्टी

समितीच्या विद्यार्थी विकास केंद्राच्या वतीने २७ सप्टेंबर रोजी Leadership Training Program – VSS Visit to Chinmaya Vibhuti हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. Self- awareness, Leadership, Values, Experiential Learning, Reflection आणि Action हा या उपक्रमाचा उद्देश होता.

चिन्मय विभूतीच्या निसर्गरम्य आणि चिंतनशील वातावरणात झालेले प्रत्येक सत्र, प्रत्येक स्थळ, प्रत्येक संवाद आणि प्रत्येक अनुभव याने विद्यार्थ्यांना स्वतःकडे आणि या आयुष्याकडे नव्या नजरेने पाहायला शिकविले. सुरुवातीला मिलिंद टिळक यांनी ‘Leading the Self’ या विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी स्वानुभूती वाटिकेला भेट दिली. तेथे भिंतींवर लिहिलेले विचार, संदेश आणि विविध कोट्स यातून विद्यार्थ्यांना जीवनाचे धडे मिळाले. प्रणव गणेश मंदिराच्या भेटीत चिन्मय विभूतीमध्ये राबविण्यात येणाऱ्या पर्यावरणपूरक उपक्रमांचे निरीक्षण विद्यार्थ्यांना करता आले. त्यानंतर चिन्मय जीवन दर्शन बाळकृष्ण मेनन यांचा संपूर्ण जीवनप्रवास पाहण्याची आणि अनुभवण्याची संधी मिळाली. शेवटी सामूहिक चिंतनाचा कार्यक्रम झाला. यावेळी प्रत्येकाने आपला दिवसभरातील अनुभव कथन केला. ‘नेता स्वतः वेळेचे भान ठेवतो आणि समूहालाही त्या शिस्तीत घेऊन जातो. नेतृत्वाची सुरुवात स्वतःला ओळखण्यापासून होते. जबाबदारी स्वीकारण्यासाठी आधी स्वतःमध्ये शिस्त असणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीचे निरीक्षण आणि विचार वेगळे असू शकतात; त्यांचा आदर केला पाहिजे. संवाद म्हणजे फक्त बोलणे नव्हे, तर ऐकणे आणि समजून घेणे देखील आहे. शिकलेली गोष्ट तेव्हाच महत्त्वाची ठरते, जेव्हा ती प्रत्यक्ष कृतीत उतरते,’ हे धडे या उपक्रमातून विद्यार्थ्यांना मिळाले. विद्यार्थी विकास केंद्राच्या अध्यक्षा डॉ. ज्योती गोगटे आणि अनिता कहाते यांनी या उपक्रमासाठी पुढाकार घेतला.



### पुस्तकांच्या जगात...

# प्रेरणादायी आत्मचरित्र




मन में है विश्वास हे पुस्तक पोलीस अधिकारी विश्वास नांगरे पाटील यांच्या संघर्षमय जीवनप्रवासावर आधारित प्रेरणादायी आत्मचरित्र आहे. ग्रामीण भागातून, सर्वसामान्य परिस्थितीतून येत कठोर परिश्रम, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या बळावर आयपीएस अधिकारी होण्यापर्यंतचा प्रवास प्रभावीपणे मांडला आहे. २६ नोव्हेंबर रोजी मुंबईत झालेल्या दहशतवादी हल्ल्यादरम्यानचे त्यांचे अनुभव प्रेरणादायी आहेत. ध्येय निश्चत करणे, ते साध्य करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे, अपयशाने खचून न जाणे आणि स्वतःवर विश्वास ठेवणे, हा संदेश या पुस्तकातून मिळतो. नांगरे पाटील म्हणतात, जेवढा मोठा संघर्ष, तेवढे मोठे यश.

हे पुस्तक केवळ आत्मचरित्र नसून, ते जीवनात यश मिळविण्यासाठी मार्गदर्शन करते.श्री. नांगरे पाटील यांनी शिक्षण,स्पर्धा परीक्षेची तयारी, अपयश, यश आणि सेवाकाळातील अनुभव प्रामाणिकपणे कथन केले आहेत. जिद्द, मेहनत आणि चिकाटी यांचे महत्त्व अधोरेखित करणारे हे पुस्तक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे.

**पुस्तकाचे नाव- मन में हैं विश्वास**
**लेखक- विश्वास नांगरे पाटील**

- **अंकिता धुमाळ,** द्वितीय वर्ष बीए एलएलबी